मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नियुक्तीचे निकष व कार्यपध्दती निश्चित करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**

शासन परिपत्रक- क्रमांक ग्रापंनि २०२०/प्र.क्र. २६ /पं.रा.-२
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १४ जुलै, २०२०.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन राजपत्र सन २०२० चा अध्यादेश क्र.१०, दिनांक २५ जून, २०२०.
२. ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक ग्रापंनि २०२०/प्र.क्र. २६ /पं.रा.-२, दिनांक १३ जुलै, २०२०.

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र. १ अन्वये, सन २०२० चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१०, दिनांक २५ जून, २०२० अन्वये राज्य निवडणूक आयोगाच्या वेळापत्रकानुसार पंचायतींच्या निवडणूका घेणे शक्य नसलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती करण्याबाबत महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १५१ मधील पोट-कलम १ मध्ये, खंड (क) मध्ये तरतुद करण्यात आली आहे.

तसेच, संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये, राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर योग्य व्यक्तीची प्रशासक म्हणून नियुक्त करण्याचे शासनाचे अधिकार संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. ग्रामपंचायतीवर प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यासाठी योग्य व्यक्तीच्या निवडीसाठी निकष व कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-**

जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून योग्य व्यक्तीची नियुक्ती संबंधित जिल्हयांचे पालकमंत्री यांच्या सल्ल्याने करण्यापुर्वी पुढील बाबी मा. पालकमंत्री यांच्या निर्दशनास आणून देणे आवश्यक राहील:-

१. प्रशासक म्हणून ज्या व्यक्तीची निवड करण्यात येईल अशी व्यक्ती त्या गावचा रहिवाशी व त्या गावच्या मतदार यादीत त्याचे नाव असणे आवश्यक राहील.

Scanned with CamScanner

२. मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीचे सरपंच व सदस्य यांना प्रशासक म्हणून नियुक्त करता येणार नाही.
३. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ नुसार जे अधिकार, कर्तव्य सरपंचास प्राप्त होते ते अधिकार व कर्तव्य प्रशासक म्हणून नियुक्त होणाऱ्या व्यक्तीस प्राप्त होतील.
४. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती प्रशासक पदाच्या कालावधीत संबंधित ग्रामपंचायतीच्या सरपंचास अनुज्ञेय असलेले मानधन व इतर भत्ते आहरीत करेल.
५. प्रशासक नियुक्ती ही पर्यायी व्यवस्था असल्यामुळे प्रशासकाचे पद कोणत्याही प्रवर्गासाठी राखीव ठेवता येणार नाही.
६. ज्या दिवशी विधिग्राहयरित्या गठीत झालेली ग्रामपंचायत अस्तित्वात येईल त्या दिवसापासून प्रशासक पद व अधिकार तात्काळ संपुष्टात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ए.का.गागरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य,
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव,
४. मा. मुख्यमंत्री याचे प्रधान सचिव/ सचिव,
५. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
७. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव,
८. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग यांचे स्वीय सहायक,
९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१३. सर्व गट विकास अधिकारी,
१४. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सर्व उपायुक्त,
१६. विभागीय आयुक्त कार्यालय,
१७. सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद,
१८. निवडनस्ती (कार्यासन पंचायत राज-२)

Scanned with CamScanner